**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**
**मा. मुख्यमंत्री यांचे अवलोकनार्थ**
**राज्यातील दैनंदिन वृत्तपत्रातील महत्त्वाच्या बातम्यांचा गोषवारा**
**दिनांक : २५ नोव्हेंबर, २०१५**

| क्र. | जिल्हा | बातमीचे शीर्षक व मथळा | वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १. | **ठाणे** | **विजेच्या लपंडावाने रहिवासी त्रस्त**<br>एकीकडे आठवड्यातून दोन दिवस पाण्याविना काढावे लागत असताना ठाणे,कल्याण व बदलापूर पर्यंतच्या पट्टयात वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रकार वाढू लागल्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. गेल्या ३ ते ४ दिवसांपासून संध्याकाळी पाऊस सुरु झाला की, काही वेळासाठी वीजदेखील गायब होते. त्याचवेळी कामावरुन घरी परतणा-या चाकरमान्यांची वीजेअभावी प्रचंड गैरसोय होत आहे. | **महाराष्ट्र टाईम्स माहितीसाठी ऊर्जा** |
| २. | **ठाणे** | **शिक्षकांचा आंदोलनाचा इशारा**<br>शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी सातत्याने पाठपुरावा करुनदेखील प्रश्न सुटत नसल्याच्या निषेधार्थ राज्य शिक्षक सेनेतर्फे आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. | **महाराष्ट्र टाईम्स माहितीसाठी शिक्षण** |
| ३. | **ठाणे** | **मराठी वेबसाईट अजूनही कोरीच**<br>एकीकडे इ-गर्व्हन्स डीजिटलाझेशनच्या नावाखाली स्वत:ची पाठ थोपटून घेणा-या कल्याण-डोंबिवली महापालीकेची मराठी वेबसाईट अजूनही कोरीच असून ती सुरु करण्यासाठी मुहूर्तच सापडलेला नाही. त्यामुळे मराठी वेबसाईट सुरु न झाल्यामुळे नागरीकांना इंग्रजी वेबसाईटवरच माहितीसाठी अवलंबून रहावे लागत आहे. | **महाराष्ट्र टाईम्स माहितीसाठी नगरविकास** |
| ४. | **ठाणे** | **आगाऊ रकमा घेऊन उधळपट्टी ?**<br>**कल्याण:-** कल्याण-डोंबि वली महापालीकेत गेल्या चार वर्षात घेण्यात आलेल्या विविध प्रकारच्या महापौर क्रीडा स्पर्धांवर महापालीका प्रशासनाने सुमारे १ कोटी ७५ लाखांहून अधिक रक्कम खर्च केली आहे. या स्पर्धांच्या नावाखाली क्रीडा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला जात असताना यासंबंधीची चौकशी सुरु झाली असल्याने बडया पदाधिका-यांचे धाबे दणाणले आहे. | **लोकसत्ता माहितीसाठी नगरविकास** |
| ५. | **रायगड** | **अवकाळी पावसाचा फटका. काजू, आंबा, भातपिकाचे नुकसान : बळीराजा चिंतेत.**<br>राज्यात दोन दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसाने रायगड जिल्ह्यालाही झोडपले. जिल्ह्यात अनेक भागात भातकापणी करुन त्याच्या मोळ्या आणि चाऱ्याच्या पेंढ्या वेगळ्या करुन ठेवल्या होत्या. त्या पावसात भिजल्याने नुकसान झाले आहे. तर काही ठिकाणी भातकापणी पूर्ण झाली नसल्याने भातपिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच काजू आणि आंब्याला येणाऱ्या मोहोरासाठी हा पाऊस घातक मानला जात आहे. | **सकाळ माहितीसाठी कृषी** |
| ६. | **रत्नागिरी** | **आंबा, काजू नुकसान भरपाई अद्याप जमा नाही**<br>तालुक्यात फेब्रुवारी-मार्च महिन्यात झालेल्या पावसामुळे आंबा, काजू पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. त्याकरिता शासनाने फळपिकांसाठी नुकसान भरपाईपोटी दोन टप्प्यांमध्ये कोट्यावधी रुपयांचा निधी देऊनही तालुक्यातील पाली महसूल मंडळातील अनेक गावांतील | **पुण्यनगरी माहितीसाठी कृषि व महसूल** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये अद्याप तो जमा झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. | |
| ७. | पुणे | **मागणी नाही भरती कुठून**<br>**एमपीएससी उत्तीर्ण होणाऱ्यांसमोर जागांचे प्रश्नचिन्ह**<br>महाराष्ट्र लोकसेवाआयोगाने (एमपीएससी) एकीकडे २०१६ मध्ये होणाऱ्या स्पर्धा परिक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले असताना, दुसरीकडे वर्ष २०१५ मधील एक ना दोन तब्बल आठ परीक्षांसाठी राज्य सरकारकडूनच मागणीपत्र आले नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे या पदांसाठी २०१६ च्याच नव्हे, तर २०१५ च्या परीक्षांमध्ये यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना नियुक्त्या मिळणार तरी कधी, असा सवाल उपस्थित होत आहे. | **महाराष्ट्र टाईम्स माहितीसाठी सा.प्र.वि.** |
| ८. | पुणे | **सुधारित अहवाल कधी ?**<br>**पुणे मेट्रोसाठी तारीख पे तारीख सुरुच**<br>मेट्रो आणि प्रतीक्षा हे दोन शब्द समानार्थी ठरले असून, सोमवारी सादर होणारा मेट्रोचा सुधारित अहवाल पुन्हा लांबणीवर पडला आहे. दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (डीएमआरसी) येत्या आठवडयाच्या अखेरपर्यंत आता हा अहवाल प्राप्त होण्याची शक्यता आहे. | **महाराष्ट्र टाईम्स माहितीसाठी नगर विकास विभाग** |
| ९. | सातारा | **जिल्ह्यातील नव्या औद्योगिक वसाहतींना खीळ**<br>**भूसंपादन कायद्याच्या कचाट्यात प्रक्रिया अडकली**<br>नव्याने लागू होणाऱ्या भूसंपादन कायद्याच्या कचाट्यात जिल्ह्यातील सातारा, कोरेगाव, फलटण, माण, खटाव या तालुक्यात उभारण्यात येणारी औद्योगिक वसाहतींची प्रक्रिया अडकली असल्याने जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीला चालना मिळण्याचे स्वप्न भंगले आहे. | **पुढारी माहितीस्तव महसूल** |
| १०. | सातारा | **कामांचे प्रस्ताव न देणारे विभाग रडारवर**<br>**डीपीसी सभेनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाची कारवाई : दावे-प्रतिदाव्याने गोंधळात भर**<br>जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्यात येणाऱ्या कामांची यादी तयार नसल्याने निधी असूनही कामे खोळंबणार आहेत. कामांच्या यादीअभावी डीपीसी सभेत आराखडा स्थगितीची नामुष्की ओढवल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने कारवाईचा बडगा उगारला आहे. | **पुढारी माहितीस्तव महसूल** |
| ११. | सोलापूर | **ढिसाळ नियोजनाचा फटका: वैयक्तिक योजना रखडल्या**<br>**आणखीन तीन महिने योजना लांबणीवर पडण्याची शक्यता**<br>जिल्हा परिषद सेस फंडातुन घेण्यात येणा-या विविध वैयक्तिक योजना जिल्हा परिषदेच्या ढिसाळ नियोजनामुळे रखडल्या गेल्या आहेत. आणखीन तीन महिने याबाबत कार्यवाही सुरूच राहणार असल्याने मार्चनंतर लाभार्थ्यांना जि.प च्या वैयक्तिक योजनांचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. | **पुढारी माहितीसाठी सा.प्र.वि.** |
| १२. | कोल्हापूर | **ठोस निर्णय नाही, घोषणांचेच गुऱ्हाळ**<br>**कोल्हापूर रस्ते विकास प्रकल्पाचा खेळखंडोबा सुरुच**<br>शहरांतर्गत राबविण्यात आलेल्या रस्ते विकास प्रकल्पाचा खेळखंडोबा साडेपाच वर्षे सुरुच आहे. लढा, संघर्ष आणि सत्तांतरानंतरही टोल रद्दची घोषणा न होता केवळ मुदतवाढच दिली जाते. विशेष म्हणजे कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनीच अनेक वेळा घोषणा केल्या, मात्र पुढे ठोस असे काही झाले नाही. आता कोल्हापूरवासीयांना वाटते, दादांनी अभ्यास करावा, चर्चा करावी, हातात ठोस काही तरी घ्यावे, मगच टोल रद्दची घोषणा करावी. | **पुण्यनगरी माहितीसाठी नगरविकास,** |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | कोल्हापूर | **सल्लागार नियुक्त्या प्रकल्पांच्याच मुळावर**<br>**सहा वर्षांत ७०० पैकी केवळ ३०० कोटी रुपयेच खर्च, बहुतेक प्रकल्प रखडले**<br>पंचगंगा प्रदूषण मुक्ती, रंकाळा व कळंबा सुभोभिकरण व मजबुतीकरण अंतर्गत रस्ते, पावसाळी पाणी नियोजन, सांडपाणी प्रक्रिया, कचऱ्यापासून वीजनिर्मिती, नगरोत्थान योजनेसह काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजना आदींसाठी गेल्या सहा वर्षांत तब्बल ७०० कोटी रुपयांचा निधी महापालिकेला मिळाला. मात्र, मनपाकडे प्रकल्प विभाग फक्त कागदोपत्रीच असल्याने सल्लागार कंपनीच्या भरवशावरच प्रशासन राहिले. परिणामी २००८ पासून आतापर्यंत फक्त म्हणजे तीनशे कोटी रुपयांचा निधीच खर्ची पडला. सल्लागार कंपन्यांची नियुक्ती करण्याचा पायंडा प्रकल्पांचा मुळावर येत असून अनेक प्रकल्प रखडलेल्या स्थितीत आहेत. | **पुढारी**<br>**माहितीसाठी**<br>**नगरविकास,** |
| १४. | कोल्हापूर | **महिला अत्याचारविरोधी हेल्पलाईनचा फज्जा**<br>महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी फक्त १०३ नंबर डायल करा असा गवगवा करीत शासनाने हेल्पलाईन सुरु केली असली तरी ही हेल्पलाईन कोल्हापूर जिल्ह्यात महिलांना होपलेसच ठरत आहे. एखाद्या महिलेने मदतीसाठी लँडलाईनवरुन या नंबरवर फोन केल्यास हा नंबर अस्तित्वात नसल्याचा संवाद कानावर पडतो. अगोदरच खचलेल्या संबंधित महिलेच्या मानसिक त्रासात आणखीनच भर पडते, पण मोबाईलवरुन या हेल्पलाईनवर फोन केल्यास प्रतिसाद मिळतो. मात्र हा फोन ट्रान्सफरच्या गर्तेतच फिरत राहतो. हा सारा तांत्रिक विषय झाला, तरी मुळात अशी हेल्पलाईन असल्याची माहितीच अनेक महिलांना नसल्याचे सत्य आहे. त्यामुळे ही सुविध महिलांना हेल्प करण्यापेक्षा जादा अत्याचारच करणारी ठरत आहे. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**गृह** |
| १५. | कोल्हापूर | **थेट पाईपलाईनचा बोजवारा उडविल्यानंतर सुशोभिकरणाचाही फज्जा**<br>कळंबा तलाव व परिसर संवर्धनासाठी दहा कोटी रुपयांचा निधी येऊन दोन वर्षे उलटल्यांनतर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. मात्र, सल्लागार कंपनी असलेल्या युनिटी कन्सल्टन्सीने तयार केलेला डीपीआर (डेव्हलपमेंट प्रोजेक्ट रिपोर्ट) सदोष असल्याने थेट पाईपलाईन योजनेप्रमाणेच तलाव शुभेभिकरणाचाही फज्जा उडाल्याचे चित्र आहे. | **पुढारी**<br>**माहितीसाठी**<br>**नगरविकास** |
| १६. | सांगली | **कोट्यवधींचा निधी... दुबळी मनपाची झोळी**<br>**भ्रष्टाचार, अनागोंदी कारभारामुळे अनेक योजनांच्या अनुदान परतीची नामुष्की**<br>महापालिकेवर विविध योजनांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारकडून कोट्यवधींच्या निधींचा वर्षाव केला आहे. परंतु या निधीला भ्रष्टाचार, नियोजनशून्य अनागोंदी कारभाराची लागलेली किड योजनाच गिळंकृत करीत आहे. यामुळे योजनांचा बोऱ्या वाजून निधी परतीची नामुष्की आली आहे. | **पुढारी**<br>**माहितीसाठी**<br>**वित्त** |
| १७. | सांगली | **कवठेमहांकाळ योजनेवरील २२ गावांचे पाणी बंद**<br>**पाच दिवसांपासून ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती** | **पुढारी** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मणेराजुरी व येळावी प्रादेशिक योजनेपाठोपाठ कवठेमहांकाळ प्रादेशिक योजनेच्या भिलवडी येथील कृष्णा नदीतील विद्युत मोटारीच्या पंपात बिघाड झाल्याने गेल्या पाच दिवसांपासून कवठेमहांकाळ प्रादेशिक योजनेवरील २२ गावांचा पाणी पुरवठा बंद झाला आहे. | **माहितीसाठी पाटबंधारे** |
| **१८.** | **सांगली** | **कोयता घुमू लागला... पहिल्या हप्त्याचे काय?**<br>**शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था : सरासरी एकरी उत्पादनात कमालीची घट**<br>जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरु झाले आहेत. तरीदेखील जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी अद्याप पहिला हप्ता जाहिर केलेला नाही. त्यामुळे शेतकरी संभ्रमावस्थेत आहे. अद्याप गेल्या हंगामातील एफआरपीची रक्कमही मिळणे बाकी आहे. | **पुढारी माहितीसाठी सहकार** |
| **१९.** | **सिंधुदुर्ग** | **महामार्गावरील खड्डे बनताहेत जिवघेणे**<br>महामार्ग चौपदरीकरणाचा गाजावाजा सगळीकडे होत असताना सध्या मात्र अस्तित्वात असलेल्या महामार्गाची झालेली दुरावस्था वाहनधारकांसाठी जीवघेणी ठरत आहे. चौपदरीकरणाची झापडं डोळ्यावर बांधून काम करीत असलेले महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी मात्र या दुरवस्थेकडे डोळेझाक करीत आहेत, त्यामुळे अनेकदा महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे छोटे- मोठे अपघात होत आहेत. मात्र अधिकारी कुणाचा जीव जाण्याची वाट पाहत आहेत का? असा संतप्त सवाल केला जात आहे. | **तरुण भारत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम** |
| **२०.** | **सिंधुदुर्ग** | **निसर्गाच्या लहरीपणामुळे कोकणचे आंबा पीक धोक्यात**<br>देवगड तालुक्यात अचानक सुरु झालेल्या रिमझिम पाऊस व ढगाळ वातावरणाने आंबा पीक धोक्यात येऊन अनेक रोग फैलावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आंबा बागायत व्यवसाय हा बदलत्या वातावरणामुळे पूर्णत: संकटात सापडला आहे. | **पुण्यनगरी माहितीसाठी कृषी** |
| **२१.** | **नाशिक** | नाशिक आठवडाभरात पाच शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटावले<br>चांदवड तालुक्यातील रेडगावचे भाऊराव विष्णू काळे (५८) यांनी आज पहाटे तीन वाजेच्या सुमारास राहत्या घरात विष प्राशन केले, त्यांना अत्यवस्थ अवस्थेत मुलगा सचिन यांनी मनमाडच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले, तेथे उपचारादरम्यान त्यांचा सकाळी मृत्यू झाला. प्रथम मनमाड पोलीस ठाण्यात सचिन यांनी दिलेल्या माहितीवरुन अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. | **सामना माहितीसाठी मदत व पुनर्वसन** |
| **२२.** | **जळगाव** | **विमा रक्कमेसाठी शेतकरी आक्रमक**<br>**सरकारच मृत्यूच्या दाढेत ढकलत असल्याचा आरोप**<br>अपुरे पर्जन्यमान, अवकाळी पाऊस व गारपिटीचा फटका, वादळाचा तडाखा अशा अस्मानी संकटांनी त्रस्त शेतक-यांला शासनाच्या उदासीन धोरणाचा सुलतानी फटकाही बसतो. फळपीक विमा योजनेंतर्गत नुकसान होऊनसुध्दा जिल्हयातील हजारो शेतक-यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मुदत संपूनही आज पर्यंत मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी आता आक्रमक झाले असून, सरकाच शेतक-यांना मृत्यूच्या दाढेत ढकलत असल्याचा आरोप मंगळवारी जिल्हयातील शेतक-यांनी केला. | **सकाळ माहितीसाठी मदत व पुनर्वसन** |
| **२३.** | **अहमदनगर** | **पंचावन्न पाणी योजनांची चौकशी दडपली**<br>श्रीगोंदा तालुक्यातील ५५ पाणी पुरवठा योजनांची चौकशीच दडपली गेल्याची चर्चा आहे. दीड वर्षापूर्वी जिल्हा परिषदेने थाटात चौकशीचे आदेश दिले. चौकशीसाठी जिल्हयातील चार महत्वाच्या | **सकाळ माहितीसाठी जलसंपदा** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिका-यांची नियुक्तीही झाली. पण या चौकशीचे पुढे काय झाले, हे गुलदत्यातच राहीले. पाणी पुरवठा योजनेच्या कामांसह चौकशी दडपण्यासाठी अधिकारी व पदाधिक-यांचे साटेलोटे तर नाही, अशी शंका येत आहे. | |
| २४. | **अहमदनगर** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांचे धरणे आंदोलन**<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना शासन सेवेत समाविष्ट करुन घ्यावे, या प्रमुख मागणीसाठी कर्मचा-यांनी धरणे आंदोलन केले. | **पुण्यनगरी**<br>**माहितीसाठी** |
| २५. | **नंदुरबार** | **१०३ ऐवजी मोबाइल हेल्पलाइन क्रमांक**<br>महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना वाचा फोडता यावी यासाठी राज्यशासनाने सुरु केलेला १०३ क्रमांक लागतच नसल्याने पोलीस दलाकडून महिलांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी मोबाइल क्रमांक सुरु करण्यात आला आहे. हा क्रमांक सुरळीतपणे सुरु रहावा यासाठी दूरसंचार विभागाला पोलीस दलाने पत्र देऊनही कारवाई झालेली नाही. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**गृह** |
| २६. | **औरंगाबाद** | **दुष्काळी अनुदानासाठी उपोषण**<br>**टोलवाटोलवी: वैजापूरात २ हजार शेतकरी अद्याप अनुदानापासून वंचित**<br>वैजापूर: आज या, उद्या या , असे करीत तब्बल दहा महिने उलटले तरी वैजापूर तालुक्यातील २०१६ शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाची दमडीही मिळाली नाही. शेतकरी दररोज बँक व तहसील कार्यालयाचे उबंरठे झिजवत आहेत. अधिकाऱ्यामधील समन्वयाअभावी वैजापूर तालुक्यातील शेतकरी अनुदान मिळविण्यासाठी सोमवारपासून (दि. २३), तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**मदत व पुनर्वसन** |
| २७. | | **लाडसावंगी परिसरात नवीन बंधारे उभारावेत**<br>**शेतकऱ्यांची मागणी, अतिवृष्टीत मोठी पडझड**<br>लाडसावंगी: औरंगाबाद परिसरात १७ व १८ सप्टेंबरला झालेल्या अतिवृष्टीमुळे लाडसावंगी, सय्यदपूर, औरंगपूर शिवारातील दुधना नदीवरील कोल्हापूरी, सिमेंट बांध पूर्णपणे वाहून गेले आहेत. बांधाच्या दोन्ही बाजूंनी मातीही वाहिली आहे. प्रशासनाने दुरुस्ती करण्याऐवजी नवीन बंधारे उभारावेत, अशी मागणी शेकऱ्यांनी केली आहे. | **सकाळ**<br>**माहितीसाठी**<br>**मदत व पुनर्वसन** |
| २८. | **अमरावती** | **अखेर मरण आलेच, ३९ कर्मचारी पदमुक्त**<br>**भूविकास बँकेला टाळे : कार्यालयातून पाय निघेना !**<br>सहा महिन्यांपूर्वी राज्यातील शिखर बँकेसह 29 भूविकास बँका बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयावर आज मंगळवारी मध्यान्हांतर शिक्कामोर्तब करण्यात आले. अमरावती जिल्हा भूविकास बँकेत कार्यरत असलेल्या 39 अधिकारी-कर्मचाऱ्यांना सेवामुक्त करण्यात आले. सेवामुक्तीची नोटीस हाती आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे डोळे यावेळी पाणविले होते. | **लोकमत**<br>**माहिती**<br>**सहकार** |
| २९. | **अमरावती** | **बिंदुनामावली मंजूर नसताना 170 कृषी सेवकांची भरती**<br>**"जेडीए" अमरावती : विभागीय बदल्यांमधील अडचणींनी बिंग फोडले**<br>बिंदूनामावली मंजूर नसताना अमरावतीच्या कृषी सहसंचालक कार्यालयाने तब्बल 170 कृषी सेवक पदाची भरती घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या कृषी सेवकांच्या आंतर विभागीय बदल्यांमधील अडचणींनी या नियमबाह्य भरतीचे बिंग फोडले आहे. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**सामान्य प्रशासन** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | अमरावती | **सदोष डायलिसीसने 18 रुग्णांना हिपॅटायटीस**<br>**सुपर स्पेशालिटीमधील प्रकार : कालमर्यादा संपल्यानंतरही यंत्रांचा वापर**<br>येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील नेफ्रॉलॉजी विभागातील सदोष डायलिसीसने तब्बल 18 रुग्णांना संक्रमण होऊन हिपॅटायटीस ची लागण झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. | **लोकमत माहितीसाठी आरोग्य** |
| ३१. | अमरावती | **महिलांपर्यंत पोहोचलीच नाही हेल्पलाईन**<br>**12 पोलीस ठाण्यांचाही खो : नियंत्रण लक्षात विशेष पथक पाच टक्क्यांपेक्षाही कमी महिला जागरुक**<br>अत्याचारग्रस्त आणि पोलीस मदत हवी असणाऱ्या महिलांसाठी विशेष हेल्पलाईन क्रमांकाची सेवा आहे. मात्र, हा क्रमांक महिलांपर्यंत पोहचविण्यात जिल्हा व शहर पोलीस दल अपयशी ठरले. जिल्हाभरातील 29 पैकी 12 पोलीस ठाण्यांमध्ये आजही हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित झालेला नाही. | **लोकमत माहितीसाठी माहिला व बाल विकास, गृह** |
| ३२. | अमरावती | **मेळघाटातील शेतकरी शेतीच्या मोबदल्यापासून वंचित**<br>*** चार वर्ष लोटूनही तलावात गेलेल्या शेतीचे पैसे नाही**<br>*** 10 शेतकरी कुटुंबियांवर उपासमारीची वेळ**<br>*** जि.प.सीईओ यांना दिले निवेदन**<br>मेळघाटातील मोमवारखेडा तलावात गेल्या चार वर्षापूर्वी 10 शेतकऱ्यांची शेती शासनाने अधिग्रहीत केली: मात्र अद्यापर्यंत या शेतकऱ्यांना 1 रुपयासुध्दा देण्यात आला नाही. त्यामुळे आदिवासी कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. | **लोकमत माहितीसाठी मदत व पुनर्वसन** |
| ३३. | यवतमाळ | **"सीसीआय"च्या कापूस खरेदी केंद्रांना जिनिंग-प्रेसिंगचा अडसर**<br>**विदर्भात 32 तर खान्देश-मराठवाड्यात आठवडाभरात 35 केंद्र**<br>विदर्भात सीसीआयचे (कार्पोरशन ऑफ इंडिया) 16 खरेदी केंद्र उघडण्यात आले असून आठवडाभरात हा आकडा 32 वर जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या केंद्रांना जिनिंग-प्रसिंग आणि मुख्य विक्री अधिकाऱ्यांच्या (ग्रेडर) च्या उपलब्धतेचा अडसर निर्माण होत असल्याचेही सांगण्यात आले. | **लोकमत माहितीसाठी सहकार व पणन** |
| ३४. | नागपूर | **धूमस्टाईलने एकाच दिवशी ५ महिलांना लुटले**<br>राज्यात जास्त गुन्हेगारांविद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केल्याचा नागपूर शहर पोलिसांचा दावा असताना धूमस्टाईल सोनसाखळी चोरांनी एकाच दिवशी ५ महिलाचे मंगसुत्र लुटले. या घटना दोन तासाच्या आत घडल्या असून यामध्ये सुमारे पावणेदान लाखांचा ऐवज पळविण्यात आला असून सोनसाखळी चोरांना प्रतिबंध घालणे व महिलांमध्ये सुरक्षितेची भावना निर्माण करणे शहर पोलीसांसमोर आव्हान ठरले आहे. | **पुण्य नगरी गृह विभाग** |
| ३५. | नागपूर | **नहीं पहुंचा निर्देश**<br>विमानतल पर जानवरों व पक्षियों के संभावित खतरों को टालने संबंधी डीजीसीए ने तीन दिन पूर्व देश के २० विमानतलो को निर्देश जारी किए थे. इसमे नागपूर एरपोर्टे भी शामील है. | **लोकमत समाचार** |
| ३६. | भंडारा | **पुन्हा एका शेतकऱ्याची आत्महत्या**<br>**कधी संपणार दृष्टचक्र : आर्थिक मदतीपासून शेतकरी वंचित**<br>ययंदाच्या खरीप हंगामात पावसाने दिलेली दडी, त्यातून उद्ध्वस्त झालेले धानपिकामुळे प्रचंड आर्थिक कोंडीत सापडलेला जिल्हयातील शेतकरी वैतागून म्यृत्यूला कवटाळत आहे. याच कर्जबाजारीपणाला कंटाळून बारव्हा येथील शेतकऱ्यांने स्वत:च्या शेतावरील आंब्याच्या झाडाला | **लोकशाही वार्ता माहितीसाठी प्रशासन** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गळफास लावून आत्महत्या केली. दिगंबर हिरामन मेश्राम (५०) असे या शेतकऱ्याचे नाव आहे. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. | |
| **३७.** | **भंडारा** | **नाला नाही आणि साठवणूकीची जागाही नाही...**<br>**सपाट मैदानावर साठवण बंधारा ?**<br>**१५ लाख रुपयांचा खर्च पाण्यात : शासकीय निधीचा चुराडा**<br>सिंचन क्षमता वाढीसाठी विविध योजनांमधून शासनाने नाल्यांवर साठवण बंधारे बांधण्याची योजना आणली असली तरी, चुकीच्या जागी बंधाऱ्यांची कामे करीत शासकीय निधीचा चुराडा करण्याचे काम पाटबंधारे विभागाकडून झाल्याचे समोर आले आहे. लाखांदूर तालुक्यातील बोथली (जूनी) येथे गावातील मुख्य रस्त्यालगत नाला किंवा पाणी साठवणूकीसाठी जागा नसतांनाही नियमबाहयरित्या साठवण बंधारा बांधण्यात आला. या बंधाऱ्याचा शेतकऱ्यांना कोणताच उपयोग होत नसून, त्यावरील १५ लाखाचा खर्च पाण्यात गेल्याचे दिसून येते. | **पुण्यनगरी**<br>**माहितीसाठी**<br>**जलसंधारण व जलसंपदा** |
| **३८.** | **वर्धा** | **व्यापा-यांकडून कापूस**<br>**उत्पादक शेतक-यांची लूट**<br>उच्च प्रतीचा कापूस असतानाही हमीभाव लागू न केल्याने तालुक्यातील व्यापारी शेतक-यांची सर्रास लूट करत आहेत. क्विंटलमागे तीनशे रुपयाचा फटका बसत असून व्यापा-यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी हैराण झाला आहे. | **सकाळ**<br>**माहितीसाठी**<br>**कृषी** |
| **३९.** | **गोंदिया** | १०३ क्रमांक कुचकामी : शासनाच्या महिला सुरक्षाविषयक योजनेची लागली वाट<br>**महिलांची हेल्पलाईन झाली 'हेल्पलेस'**<br>आपण महिला-तरुणी आहात आणि आपल्यावर अचानक एखादा बाका प्रसंग ओढवला तर स्वत:चा बचाव कसा कराल? 'महिला हेल्पलाईन आहे न... १०३ क्रमांकावर डायल करेल आणि लगेच पोलिसांची मदत घेईल... असे उत्तर तुम्ही देत असाल तर सावधान पोलिसांच्या हेल्पलाईनवर तुम्ही विसंबून असाल आणि त्यावर फोन केल्याने तुम्हाला लगेच मदत मिळेल, असा विचार तुम्ही केला असेल तर वेळीच सावध व्हा. कारण गोंदिया जिल्हयात पोलिसांचा १०३ हा हेल्पलाईन क्रमांक चक्क अनेक दिवसांपासून बंद आहे. हा क्रमांक अस्तित्वात नाही अशी टेप ऐकण्याचा प्रसंग मदत मागणाऱ्या कोणत्याही अबलेवर येऊ शकतो. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**गृह** |
| **४०.** | **गडचिरोली** | **गडचिरोलीतील १०३ हेल्पलाईन बंदच**<br>महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी राज्य शासनाने १०३ हेल्पलाईन जिल्हा पातळीवर पोलीस विभागात सुरु केलर आहे. मात्र गडचिरोली जिल्हा पोलीस मुख्यालयातील हेल्पलाईन बंद असल्याचे दिसुन आले आहे.२५ नोव्हेंबर हा अंतरराष्ट्रीय महिला अत्याचार विरोधी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या पार्श्र्वभूमीवर लोकमतने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमधून स्पष्ट झाले आहे. ही हेल्पलाईन सुरु आहे किंवा नाही याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षकांनाही माहिती नसल्याचे त्यांच्याशी संपर्क साधल्यावर लक्षात आले. | **लोकमत**<br>**माहितीसाठी**<br>**गृह** |
| **४१.** | **गडचिरोली** | **अर्धवट सिंचन प्रकल्प अधिवेशनात गाजणार**<br>राज्यात अतिमागास व उद्योग विरहित जिल्हा म्हणून गडचिरोलीची ओळख आहे.अनेक वर्षापासून येथे सिंचनाच्या सुविधेचा प्रश्न रेंगाळत आहे.अनेक लोकप्रतिनिधींनी या पुर्वी सिंचनाच्या समस्येवर भर देत कोट्यवधी | **पुण्यनगरी**<br>**माहितीसाठी**<br>**जलसंधार व जलसंपदा** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रुपयांच्या योजना मंजुर करूण घेतल्या. या निधीतून बांधकामही करण्यात आले. मात्र, सदर योजनेच्या माध्यमातून १ इंच जमीन सिंचनाखाली येऊ शकली नाही त्यामुळे या सर्व अर्धवट सिंचन योजनांचा पाढा नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनात वाचला जाणार आहे. या दृष्टीने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी माहिती गोळा करण्याच्या कामात व्यस्त झालेले आहे. | |
| **४२.** | **गडचिरोली** | **मुख्यमंत्र्यांतर्फे पंतप्रधानांना जाब विचारणार, विदर्भ राज्य आंदोलन समितीचा इशारा**<br>भाजपने लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दिलेले "संतत्र्य विदर्भ राज्य" व शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य हमीभाव देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या दिलेल्या आश्वासनाची पूर्तता एक वर्षाचा कालावधी लोटूनही झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करुन मुख्यमंत्र्यांच्या वतीने पंतप्रधानांना जाब विचारणार असल्याच्या इशारा विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आयोजीत पत्रकार परिषदेतुन दिला आहे. | **पुण्यनगरी**<br>**माहितीसाठी** |
| **४३.** | **दिल्ली** | **Amir Khan can go to Pakistan, says Shiv Sena**<br>Film Star Amir Khan found himself at the centre of a raging controversy on the issue of tolerance on Tuesday with saffron parties attacking him for stoking “fear” and telling him to “go to Pakistan” of he felt insecure in the country. | **The Hindu**<br>**माहितीसाठी** |
| **४४.** | **दिल्ली** | **GST Bill tops agenda for winter Session**<br>In what promises to be yet another difficult session of Parliament —scheduled to commence on November 26 coming as it does soon after the Bihar elections , the government’s top priority remains the controversial Goods and Service Tax(GST)Bill. Prime Minister Narendra Modi made this clear in Singapore on Tuesday. | **The Hindu**<br>**माहितीसाठी**<br>**वित्त** |
| **४५.** | **दिल्ली** | **Govt mulls 26-wk maternity leave**<br>The BJP government is considering a proposal to increase the maternity leave for working women from the existing 12 weeks to 26 weeks. | **The Times of India**<br>**माहितीसाठी**<br>**सा.प्र.वि.** |
| **४६.** | **दिल्ली** | **सूखे के असर को कम करने में जुटी केंद्र सरकार**<br>मौसम विभाग के आंकडो के हिसाब से भले ही देश के 300 से अधिक जिले सूखे की चपेट में हो, लेकिन राज्य सरकारों की नजर में केवल 200 जिले ही सूखाग्रस्त है. अब तक सात राज्यों ने अपने यहां सूखे का एलान किया है. | **दैनिक जागरण**<br>**माहितीसाठी** |
| **४७.** | **दिल्ली** | **चीनी मिलों को 104 करोड लीटर एथेनाल का आर्डर मिला**<br>चीनी उद्योग को इस वित्त वर्ष में अब तक 104 करोड लीटर एथेनाल आपूर्ति के लिए ठेका मिला है. इससे सरकार को विदेशी मुद्रा के रूप में लगभग 5000 करोड रूपए की बचत हो ने की उम्मीद है. | **राष्ट्रीय सहारा**<br>**माहितीसाठी** |

**०००**